# पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त

**प्रकल्प प्रवर्तक खडकवासला प्रकल्पाच्या नवीन मुठा उजवा कालवा किमी १ ते ३४ किमी साठी पर्यायी खडकवासला- फुरसुंगी बोगदा प्रकल्प, पुणे, महाराष्ट्र प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत्त**

प्रकल्प प्रवर्तक खडकवासला प्रकल्पाच्या नवीन मुठा उजवा कालवा किमी १ ते ३४ किमी साठी पर्यायी खडकवासला- फुरसुंगी बोगदा प्रकल्प, पुणे, महाराष्ट्र प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक २८/०२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता खडकवासला येथे आयोजित करण्यात आलेली होती.

समन्वयक, श्री. कार्तिकेय लंगोटे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे-१, यांनी मा.ज्योती कदम, अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती व इतर सदस्य तसेच प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे म.प्र.नि. मंडळ आणि जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्यातर्फे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

सदर प्रकल्पास दिनांक ३/१२/२०२४ रोजी पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, केंद्र शासन यांचेकडुन Terms of Reference (ToR) मंजूर करण्यात आला. त्यानुसार प्रकल्प प्रवर्तकांने प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करुन भारत सरकारच्या पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार सादर केला. खडकवासला प्रकल्पाच्या नवीन मुठा उजवा कालवा किमी १ ते ३४ किमी साठी पर्यायी खडकवासला- फुरसुंगी बोगदा प्रकल्प, ता. हवेली जि. पुणे, महाराष्ट्र प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठीचा अर्ज म.प्र.नि.मंडळास प्राप्त झाला.

अपर जिल्हाधिकारी, पुणे यांच्या दिनांक १६/०१/२०२५ च्या पत्रानुसार जनसुनावणीसाठी दिनांक २८/०२/२०२५ ही तारीख निश्चित करण्यात आली. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई- १५/२०२५, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी(डब्लुपीसी)/पीएच/बी-२५०२२७-एफटीएस-००९९, दिनांक २७/०२/२०२५अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित करण्यात आली:-

१. **मा.ज्योती कदम** - **अध्यक्ष**
मा. निवासी उपजिल्हाधिकारी-पुणे तथा
(अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे)

२. **श्री. जगन्नाथ साळुंखे** - **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे

३. **श्री.कार्तिकेय लंगोटे,** - **समन्वयक**
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे-१.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार जनसुनावणीच्या ३० दिवस अगोदर सदर प्रकल्पाची जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आज शुक्रवार दिनांक २८/०२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता असल्याची जाहिर सूचना दिनांक २५.०१.२०२५ रोजीची सूचना व दि. २१/०२/२०२५ रोजीचे शुद्धीपत्रक स्थानिक मराठी वृत्तपत्र लोकसत्ता व इंग्रजीत राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यात प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप जनतेस, पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या संस्था यांना कळविण्यात आलेले होते.

तसेच या प्रकल्पाचे दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत जनतेच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे., जिल्हा उद्योग केंद्र, पुणे. , जिल्हा परिषद कार्यालय, पुणे. प्रादेशिक कार्यालय व उप प्रादेशिक कार्यालय पुणे-१, मप्रनि मंडळ, जोग सेंटर, २ रा व ३ रा मजला, वाकडेवाडी, पुणे-मुंबई रस्ता, पुणे- ४११ ००३., मा. सदस्य सचिव, मप्रनि मंडळ (मुख्यालय), कल्पतरू पॉईंट, तिसरा मजला, सायन-माटुंगा स्किम रोड क्र. ७, सिनेप्लॅनेट समोर, सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व), मुंबई-२२, झोनल कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरीयाट बिल्डींग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हील लाईन, नागपूर- ४४०००१, पर्यावरण विभाग नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय मुंबई-३२, पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत, शिवाजीनगर, मंगला टॉकिज समोर-४११००५, फुरसुंगी, उरळी देवाची नगरपरिषद, ता. हवेली जिल्हा पुणे, ग्रामपंचायत कार्यालय, वडकी, लोणी काळभोर, ता. हवेली जि. पुणे, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेत स्थळ येथे उपलब्ध आहेत असे कळविण्यात आलेले होते.

आयोजक यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी लेखी सूचना द्यावयाच्या असल्यास त्या म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधीकडे देण्यात याव्यात. त्या अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना सादर करता येतील. ज्यांना तोंडी प्रश्न विचारायचे असतील, त्यांनी सादरीकरणानंतर आपले नांव व गाव स्पष्टपणे सांगून मांडावेत. प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार त्या प्रश्नांची उत्तरे देतील. सदरहू बैठकीचे इतिवृत्त तयार करण्यात येऊन ते म.प्र.नि.मंडळाच्या मुख्यालयातर्फे पर्यावरण, वन व वातावरणीय

बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करण्यात येईल. ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून कोणताही निर्णय वा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. सदरहू सूचना/आक्षेप यांची इतिवृतांत नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जसीच्या तसी चित्रफित, बैठकीत उपस्थित सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकास सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण विभागास सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

अध्यक्षांनी, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन प्रकल्प अधिका-यांना व त्यांच्या तांत्रिक सल्लागारांना पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती शासनाच्या व स्थानिक भाषा मराठीतून करण्याची सूचना केली व सर्व जनसमूहाला निर्भयतेने त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाने नियुक्त केलेल्या तांत्रिक सल्लागारांनी पर्यावरण विषयक प्रकल्पाचे सादरीकरण केले. या सादरीकरणामध्ये सल्लागारांनी सांगितले की, खडकवासला प्रकल्पाच्या नवीन मुठा उजवा कालवा किमी १ ते ३४ किमी साठी पर्यायी खडकवासला- फुरसुंगी बोगदा प्रकल्प, पुणे, प्रकल्पाच्या आजच्या सुनावणीत उपस्थित सर्वांचे स्वागत. सदर प्रकल्प ता. हवेली जि. पुणे या जिल्हयामध्ये प्रस्तावित आहे सदर प्रकल्पांची ओळख थोडक्यात आपणास देत आहोत. कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण विभाग (भिउखो), पुणे अंतर्गत खडकवासला प्रकल्पाच्या नवीन मुठा उजवा कालवा किमी १ ते ३४ किमी साठी पर्यायी खडकवासला- फुरसुंगी बोगदा प्रकल्प, पुणे ची कार्यवाही सुरु आहे. या प्रकल्पाचा पर्यावरण मान्यतेचा प्रस्ताव परिवेश २.० पोर्टलवर दि.२५/०१/२०२४ रोजी सादर करण्यात आला. त्यानंतर MoEF & CC, नवी दिल्ली यांच्याद्वारे TOR दि. ०३/१२ /२०२४ रोजी जारी केले. बेस लाईन मॉनिटरिंग आणि डेटा संकलन मान्सुन पुर्व (उन्हाळी हंगाम) मार्च ते मे २०२४, पावसाळी हंगाम जुन ते ऑगस्ट २०२४, मान्सुन पश्चात ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४ या तीन टप्प्यांमध्ये करण्यात आले. त्यानुसार सार्वजनिक सुनावणीच्या जाहीराती इंडियन एक्सप्रेस आणि लोकसत्ता दि.२५/०१/२०२५ रोजीच्या वृत्तपत्रामध्ये देण्यात आल्या तसेच शुद्धीपत्रक दि. २१/०२/२०२५ रोजी इंडियन एक्सप्रेस आणि लोकसत्ता या वृत्तपत्रात देण्यात आले होते.

खडकवासला- फुरसुंगी बोगदा प्रकल्प खडकवासला धरणापासुन सुरु होऊन अस्तित्वातील नवीन मुठा उजवा कालव्यास कि.मी ३४ मध्ये मिळतो प्रकल्पाची एकुण लांबी २६.६६७ कि.मी असुन सदर बोगद्याची संरेखा खडकवासला, किरकटवाडी, धायरी, न-हे, आंबेगाव खुर्द, कात्रज, मांगडेवाडी, येवलेवाडी, पिसोळी, वडाचीवाडी, औताडेवाडी, वडकी, लोणी काळभोर या गावातुन जाते. सदर प्रकल्पामुळे २.१८ अघफु पाणीबचत होणार असुन याचा सिंचन व बिगरसिंचनासाठी उपयोग करता येईल. तसेच पाणीबचतीतुन नवीन मुठा उजवा कालव्यावरील ३४७१ हेक्टर सिंचन क्षेत्र पुनर्स्थापित होणार आहे.

१० किलोमीटर त्रिज्येच्या अभ्यास क्षेत्रात राजीव गांधी प्राणी उद्यान आणि वन्यजीव संशोधन केंद्र, कात्रज, पुणे व पश्चिम घाटातील घेरा सिंहगड हे गाव येत आहे. प्रकल्प क्षेत्र हे भारताच्या भुकंपीय क्षेत्र नकाशा २००२ च्या IS १८९३ भाग १ नुसार झोन ३ म्हणजेच मध्यम जोखीम क्षेत्र अंतर्गत येते. त्याचे जे पर्यावरणीय नकाशा आहेत ते पीपीटीद्वारे थोडक्यात दाखविले. प्रकल्पासाठी एकूण २३.०३ हेक्टर खाजगी जमीन (११.७१ हेक्टर क्षेत्र संपादित केले जाईल व उर्वरित ११.३२ हेक्टर क्षेत्र भाडेतत्वावर घेण्यात येईल) आणि ०.८०६४ हेक्टर वनजमीन संदर्भात वनविभागाकडुन तत्वत: मंजुरी (Stage-१ मान्यता) प्राप्त झालेली आहे. या प्रकल्पासाठी जे मनुष्यबळ लागणार आहे ते बांधकाम टप्प्यामध्ये कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांची अंदाजे संख्या ७५ असेल आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांची अंदाजे संख्या १३५० असेल आणि प्रकल्प सुरु होईल त्या दरम्यान कायमस्वरुपी मधील अंदाजे संख्या ५८ असेल व कंत्राटी कर्मचाऱ्यांची अंदाजे संख्या २० असेल. प्रकल्पाचा खर्च २१९०.४७ कोटी रुपये अपेक्षित आहे. पर्यावरण संवर्धनासाठी कंपनीने भांडवली खर्च १.९३ कोटी रुपये राखीव ठेवलेला आहे. तसेच आवर्तीक खर्च १.६० कोटी प्रत्येक वर्षासाठी संरक्षित केलेला आहे.

प्रकल्पाच्या १० कि.मी. त्रिज्येच्या परिसरातील हवेची गुणवत्ता, ध्वनी तिव्रता, पाणी व भूजल मातीची गुणवत्ता, भुभाग इ. घटकांचा अभ्यास माहे मार्च ते मे २०२४, जुन ते ऑगस्ट २०२४, ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४ कालावधीत करण्यात आला.

परिसरातील हवा गुणवत्ता अभ्यास ८ ठिकाणी करण्यात आला पृष्ठभागावरील ४ ठिकाणचे पाण्याचे नमुने घेतले, भुजलाचे १२ नमुने घेतले, व मातीचे १२ ठिकाणचे नमुने घेतले. हवेची गुणवत्ता राष्ट्रीय परिवेशी वायु गुणवत्ता मानंकानुसार मर्यादित असल्याचे आढळुन आले. मातीचा दर्जा शेतीसाठी उत्तम असल्याचे आढळले.

तसेच पर्यावरणाचे व्यवस्थापन बांधकामादरम्यान नियंत्रीत पध्दतीने ब्लास्टिंगची खात्री केली जाईल. तसेच हवेचे प्रदुषण नियंत्रीत करण्यासाठी वृक्षारोपण केले जाईल तसेच ध्वनीप्रदुषण होऊ नये त्यासाठी योग्य ती उपाययोजना केली जाईल. CPCB मार्गदर्शन तत्वांनुसार आवाज कमी करण्यासाठी डिझेल जनरेटर सेट मध्ये ध्वनीक आवरण बसवली जाईल. तसेच ध्वनी पातळीचे वारंवार अधुनमधुन नियमित परिक्षण केले जाईल. पाणी गुणवत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी बांधकामाच्या टप्प्यात लेबर कॅम्पसाठी २० KLD चा पोर्टेबल STP बसवला जाईल आणि त्यातून जे पाणी वापरले जाईल त्याचा पुनर्वापर केला जाईल तसेच घनकचरा च्या व्यवस्थापनासाठी विविध योजना राबविल्या जातील त्यामध्ये ओल्या कचऱ्याची विल्हेवाट लावली जाईल तसेच जैविक खत निर्मिती करण्यात येईल. प्रकल्पस्थळी, अंतर्गत रस्ते शाफ्ट इ. ठिकाणी हरित पट्टा निर्मिती/विकसित करण्यात येईल. यासाठी सर्व साधारण २५००० स्थानिक वनस्पतींची लागवड ३.०० हेक्टर क्षेत्रावर करण्यात येईल.

पर्यावरणाचे नियोजन करण्यासाठी विभागाने आर्थिक तरतुद सादर केली आहे. त्यामध्ये हवा परिक्षण, ध्वनी परिक्षण, पृष्ठजल व भुजल गुणवत्ता परिक्षण, माती गुणवत्ता परिक्षण, मत्स्य व्यवस्थापन, वन्यजीव संरक्षण आराखडा व उत्खनन व्यवस्थापन आराखडा इत्यादीसाठी भांडवली खर्च रु. १.९३ कोटी व आवर्ती खर्च रु. १.६० कोटी राखुन ठेवला आहे. तसेच जनसुनावणी मध्ये जे मुद्दे उपस्थित केले या सर्व

**श्रीमती ज्योती कदम, मा. निवासी उपजिल्हाधिकारी- पुणे तथा (अपर जिल्हादंडाअधिकारी, पुणे)** यांनी बोगद्याची संरेखा ज्या क्षेत्रामधून जात आहे त्या क्षेत्राची गट नंबर निहाय यादी प्रसिध्द केली जावी व संरेखेवर बांधकाम करु शकतात का याबाबत माहिती देण्यास सांगितले. तसेच ग्रामस्थांना सांगितले की बोगदा जमिनीच्या खालून जाणार आहे त्यामुळे संरेखेवरच्या लोकांना अथवा शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही असे सांगितले.

**५) श्री. निळकंठ शितोळे, दौंड, पुणे**

खडकवासला धरण हे ब्रिटीशकालीन धरण असून त्यानतंर झालेल्या पानशेत, वरसगाव या धरणामध्ये ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या त्यांना भरपाई म्हणून दौंड तालुक्यात जमिनी दिल्या व शासनाला सहकार्य म्हणून त्यांचे कर्तव्य पार पाडले. परंतु ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या त्या शेतकऱ्यांना आता दौंड तालूक्यात पाणी कमी पडत आहे. शासनाच्या नियोजनाप्रमाणे मे च्या शेवटच्या पाळीसाठी पाणी कमी पडत आहे. तीन टीएमसी पाण्याची आवश्यकता आहे असे पाटबंधारे खात्याचे म्हणणे आहे म्हणजे पुर्ण सिंचन व्यवस्थित होईल. दौंड, इंदापूर व बारामती शेतकऱ्यांच्या वतीने आम्ही शासनाचे आभार मानतो की हा बोगदा करुन ते पाणी वाचवत आहेत. तसेच पुणे शहरामधुन ओपन कालवा असल्यामुळे पाणी प्रदुषित होते याच पाण्यावर दौंड तालुक्यातील पाणीपुरवठा योजना कालव्यावर अवलबूंन आहेत. कारण जमिनीतील पाणी प्रदुषित झाले आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी दौंड तालुका आणि संपुर्ण लाभधारक शेतकऱ्यांच्या वतीने आमची अनुमति आहे. व त्याबद्दल शासनाचे आभार मानतो.

**६) श्री. नरेंद्र हगवणे, किरकटवाडी, पुणे**

बोगदा कामासाठीचा पहिला शाफ्ट आमच्या शेतीमधून जाणार आहे. त्यामुळे प्रत्यक्ष प्रकल्पबाधित म्हणून दाखले मिळावेत. तसेच शाफ्ट पर्यंत येण्यासाठी जो रस्ता होणार आहे त्यासाठी सुध्दा भूसंपादन करण्यात येणार आहे सदर रस्त्यांची संरेखा ही PMRDA रस्ताच्या संरेखेच्या नकाशामध्ये प्रस्तावित केलेल्या संरेखेशी मिळती जुळती किंवा त्याच क्षेत्रावर असावी जेणेकरुन आमच्या जागेची पुन्हा विभागणी होणार नाही. याची नियोजन विभागाने काळजी घ्यावी अशी आमची मागणी आहे.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की, प्रत्यक्ष काम करताना तुमच्या मागणीचा विचार करुन, काम करण्यास सोईस्कर व शेतकऱ्यांनाही त्रास होणार नाही अशा प्रकारे संरेखा निश्चित करु. तसेच दाखले देण्यासबंधी शासकीय नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**७) श्री. रोहन सुर्यकांत मते, खडकवासला, पुणे**

सद्यस्थितीत नवीन मुठा उजवा कालवाच्या ठिकाणी पावर हाउस तयार आहे त्याच्या संदर्भात काय प्रक्रिया होणार आहे. कालवा बंद झाल्यावर पावर हाऊस चालू ठेवणार किंवा कसे? त्याविषयी काय निर्णय झाला आहे का? की पावर हाऊस चालू ठेवायचे आहे किंवा बंद ठेवणार आहे? याबाबत हरकत कोठे नोंदवावी लागेल?

प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की, सदर पावर हाउस या प्रकल्पाचा भाग नसून तो दुसऱ्या विभागाशी संबंधित आहे यासंबंधी अधिक माहिती खडकवासला पाटबंधारे विभागाकडून मिळेल. याबाबत खडकवासला पाटबंधारे विभागाकडे हरकत नोंदवावी.

अभ्यास पुणे म.न.पा मार्फत चालू आहे हा आभ्यास पूर्ण झाल्यानतंर प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल.

४) **श्री. गोकुळ निवृत्ती करंजावणे, सरपंच, किरकटवाडी, पुणे**

प्रकल्पाची कॅबिनेट मंजूरी सप्टेंबर मध्ये झाली आणि निविदा काढण्यात आले. पर्यावरण मान्यता निविदे प्रक्रियेपुर्वी का घेण्यात आली नाही? निवडणूकी पुर्वी निविदा प्रक्रिया झाली आणि पर्यावरणविषयक जनसुनावनी आत्ता केली जात आहे?

प्रकल्पाची संरेखा ज्या शेतक-यांच्या क्षेत्रातुन जात आहे त्यांची यादी सर्वे नंबरसह गावात लावण्यात यावी तसेच सदर जमीनीवर बांधकाम करणे व विंधन विवरे घेणे शक्य आहे का? सदर बाबतीत हरकत घ्यायची असल्यास याबाबत मुदतीकरिताची माहिती देण्यात यावी?

बोगदयाची रुंदी किती असणार आहे व जमिन किती संपादित करणार आहे?

बाधित शेतकऱ्यांना मोबदला मिळणार का?

संरेखेवरिल शेतक-यांची यादी तीस दिवसामध्ये प्रसिध्द करावी.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की, पर्यावरण मान्यतेची प्रक्रीया निविदा प्रक्रियेच्या आधीपासूनच सुरु करण्यात आली होती. ज्यामध्ये पर्यावरण मान्यतेच्या विविध टप्पे असतात. त्यामध्ये प्रथम Ministry of Environment, Forest & Climate Change यांच्या परिवेश २.० या पोर्टलवर प्रस्ताव सादर करणे, मा. EAC यांस TOR साठी प्रकल्पाचे सादरीकरण करणे, पर्यावरण विषयक घटकांचा अभ्यास करून पर्यावरण आघात मूल्यांकान अहवाल तयार करणे या अटींची पुर्तता करण्याच्या अनुषंगाने पर्यायवरणविषयक जनसुनावनी हा त्यातील एक टप्पा आहे.

ज्या ठिकाणी भूसंपादन करणे आवश्यक आहे त्याच्या प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे प्रत्यक्ष संयुक्त मोजनीनंतर कोणते शेतकरी बाधित होणार आहेत हे समजेल. सदर प्रक्रिया प्रगतीपथावर आहे व कोणताही निर्णय परस्पर घेण्यात येणार नाही. संबधीत शेतकऱ्यांना कल्पना देऊन त्यांच्या समवेत संयुक्त मोजणी करुनच जमिन संपादीत केली जाईल.

बोगदयाची रुंदी ६.३ मिटर असून बोगदयासाठी शाफ्ट व कट ॲन्ड कव्हर वगळता कोणत्याही भागात भूसंपादन करण्याची गरज नाही. शेवटच्या खुला कालव्याच्या दोन्ही बाजूस १५ मिटर भागात भूसंपादन करण्यात येणार आहे. सदर खूला कालवा फुरसुंगी येथे आहे. वरच्या कोणत्याही भागात बोगदयासाठी भूसंपादन करण्यात येणार नाही.

ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत होतील त्यांना शासन नियमाप्रमाणे योग्य मोबदला मिळेल. नांदेड, किरकटवाडी, खडकवासला भागात बोगदा जमिनीखालून जाणार असल्यामुळे भूसंपादन करण्यात येणार नाही. त्यामूळे मोबदला देण्याचा प्रश्न उदभवत नाही. बोगदा जमिनीखाली सरासरी ८० मिटर खोल असल्याने बांधकाम करण्यात कोणतीही अडचण येणार नाही.

प्रकल्प अधिकारी यांनी बांधकाम करण्यात येऊ शकेल असे सांगितले. संरेखेनुसार यादी सादर करण्यात येईल.

अस्तित्वातील कालवा पुणे शहरातुन जात असुन पिण्यासाठी पाणी पुणे महानगर पालिकेमार्फत दिले जाते. तसेच पाण्याममधुन, ब्रीज, रस्ते कालव्याचे जतन करणेबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल.

**३) श्री. संतोष अशोक मते, खडकवासला, पुणे**

खडकवासला धरणाचा आम्हाला काहीही उपयोग होत नाही. आमच्याकडे कमी प्रमाणात जमिनी राहिल्या आहेत. धरणापासून जमिनी २ ते ३ किमी आहेत. इतक्या दूर पाणी नेणे शक्य नाही विभागामार्फत बोगद्याने पाणी नेण्यात येणार आहे. आजुबाजुच्या बोर विहिरीचे पाणी गेले तर शेतक-यांनी काय करायचे? प्रकल्प सुरु झाल्यावर बोरचे पाणी गेले तर आम्ही कोणाला विचारणा करावी? संरेखेच्या बाजूला १ किमी परिसरात असलेल्या विहीरी व बोअरच्या पातळीचे सर्वेक्षण करावे.

खडकवासला धरणापासून बोगद्याची खोली ८० मिटर आहे का ? माझा बोर या संरेखेपासून जवळपासच आहे तरीही माझ्या बोरचे सर्वेक्षण करण्यात आले नाही.

बोगद्याचे काम झाल्यानंतर विहीरी बंद पडल्या तर कोणाकडे हरकत नोंदवावी? तसेच विहीरीच्या पाण्यावर शेतकऱ्यांची उपजिविका आहे व ती पिढयानपिढया चालणार आहे शासनाकडून मिळणारा मोबदला कमी आहे.

नविन मुठा उजवा कालव्याच्या रिकाम्या होणाऱ्या जमिनिवर पुढे काय करणार आहे व याचा शेतकऱ्यांना काय फायदा होईल?

श्री. जगन्नाथ साळुंखे प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांनी सदर प्रश्न Water Table शी निगडीत असल्याचे सांगितले.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की, बोगदा जमिनीच्या खाली सरासरी ८० ते २०० मी खोल असून बोगद्याला आतील बाजुने अस्तरीकरण करण्यात येणार आहे. त्यामुळे विहीरी व विंधन विवरांचे पाणी जाण्याचा प्रश्न उद्भवत नाही. संरेखेच्या बाजूला २०० मी परिसरात असलेल्या विहिरी व विंधन विवरांचे सर्वेक्षण व विदा संकलनाचे काम चालू असून अहवाल तयार झाल्यावर सादर करण्यात येईल. तसेच विहिरी व विंधन विवरे जमिनीपासुन ८० ते १०० फुट खाली असतात त्यामुळे विहीरी व विंधन विवरांचे पाणी बंद होण्याचा प्रश्न उद्भवत नाही. भविष्यात अशी समस्या उद्भवल्यास शासन नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

प्रकल्पाची खोली ही प्रत्येक ठिकाणी वेगवेगळी आहे आपला प्रत्यक्ष गट नंबर किती आहे हे कार्यालयात येऊन सदर गट नंबर येथे प्रकल्पाची खोली किती आहे हे नकाशात बघून सांगता येईल.

संरेखेपासून लगतच्या विहीरी व विंधन विवरांचे सर्वेक्षण केलेले आहे सर्वेक्षणाचे काम प्रगतीत आहे तरी शेतकऱ्यांच्या मागणीनुसार जास्तीच्या विहीरी व विंधन विवरांचे सर्वेक्षण करण्यात येईल. विहीरी व बोर बंद पडल्या तर त्यावर शासकीय नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

नविन मुठा उजवा कालव्याच्या रिकाम्या होणाऱ्या जमिनिवर पर्यावरणपूरक गोष्टी ज्याच्या लोकांना उपयोग होईल अशा गोष्टी करण्याचे नियोजन आहे सदरचा आभ्यास नियोजन आहे. सदरचा

गोष्टींवर लक्ष देऊन विभाग सामाजिक आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न करेल. यासाठी रु. १०.९५ कोटींची तरतुद करण्यात आलेली आहे. व्यवसायाशी संबंधीत आरोग्य व सुरक्षा यांमध्ये आरोग्य सुरक्षा पर्यावरणाची पुर्णपणे काळजी घेतली जाईल प्रकल्पात काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची प्राथमिक वैद्यकीय तपासणी करणे अनिवार्य असल्यानंतर नियुक्ती केलेल्या प्रत्येक व्यक्तीची नियतकालीन वैद्यकीय तपासणी नियमित अंतराने केली जाईल.

**खालील व्यक्तींनी चर्चेत भाग घेतला व त्यास पर्यावरण सल्लागार व प्रकल्प प्रवर्तक यांनी दिलेली उत्तरे:-**

श्री कार्तिकेय लांगोटे, समन्वयक तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांनी सुचित केले की, येथे विचारण्यात आलेले सर्व प्रश्न ग्रामस्थांच्या नाव पत्ता व संपर्क सहीत या बैठकीच्या इतिवृत्तात सविस्तर घेण्यात येतील व बैठकिचे इतिवृत्त अध्यक्षांना पाठविण्यात येईल व अध्यक्षांच्या मान्यतेनंतर शासनास सादर करण्यात येईल. जनसुनावणीचे लाइव्ह रेकॉर्डींग, फोटोजव इतिवृत्त घेण्यत येत आहेत .

१) **श्री. रमेश ज्ञानोबा मते, खडकवासला, पुणे**

बोगद्याची सुरुवात खडकवासला धरणापासून होते. खडकवासला धरण प्रकल्पासाठी खडकवासला गावातील ७५% जमिनी संपादित केल्या आहेत. फक्त २५% जमिनी शिल्लक आहेत. बोगद्याच्या प्रकल्पातुन आम्हाला पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देणार का?

बोगदा खोदाईतुन निघणारा राडा रोडा कोठे टाकण्यात येणार आहे?

येथे विचारण्यात आलेल्या प्रश्नांची आम्हास लेखी उत्तरे देणार का?

त्यावर प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की, सदर प्रकल्पासाठी शाफ्ट व कट & कव्हर व्यतिरीक्त जमिन संपादित करावी लागणार नाही. बोगद्याच्या प्रकल्पातुन पाणी उपलब्ध करुन देण्याची मागणी प्रकल्प अहवालाव्यतिरीक्त असल्याने वरिष्ठ स्तरावर मांडण्यात येईल.
यावर श्री श्रीकांत काकडे सल्लागार यांनी सांगितले की, बोगदा खोदाईतुन निघणारा राडा रोड्याची साठवणुक करण्यासाठी चार ठिकाणे निश्चित केली आहेत याचा सविस्तर आराखडा तयार झाला असून तो सादर करण्यात येईल.

येथे विचारण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे लेखी स्वरुपात समिती सदस्यांच्या सहिने इतिवृत्त स्वरूपात देण्यात येतील.

२) **श्री. दत्तात्रय महादेव कोल्हे, कोल्हेवाडी, पुणे**

विभागामार्फत जुना कालवा बंद करुन नवीन बोगदा करत आहेत. कालव्याच्या दोन्ही बाजूला विहीरी असून शेती त्या पाण्यावर अवलंबून आहे. टँकर च्या पाण्यावर लोक अवलंबून आहेत. कालव्याचे पाणी बंद झाले तर पाण्याचा तुटवडा भासेल, नागरिकांची गैरसोय होईल. शासनाने याची खबरदारी घेऊन पाण्यामधुन ब्रिज, रस्ते करावे व कालव्याचे जतन करावे.

श्री. कार्तिकेय लंगोटे उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी सांगितले की सदरचा विषय खडकवासला पाटबंधारे विभाग पुणे यांचेशी संबंधीत असल्याने आपली हरकत सदर विभागाकडे समन्वय साधून त्यांच्याकडे पाठविण्यात येईल.

**८) श्री. मनोज गायकवाड, धायरी, पुणे**

धायरी गावात जिथून जिथून बोगदा जाणार आहे तिथे कोठे शाफ्ट येणार आहे का किंवा नसेल येत जमिनिखालून 80 मिटर खोलवरून बोगदा जात असेल तर बिल्डींग परवानासाठी पुणे मनपा किंवा नगर विकास विभाग हे याबाबत हरकत करतील का?

धायरीमध्ये शाफ्ट साठी भूसंपादन करणार आहे का ?

आमच्या जागेवर marking केलेले आहे त्याबाबत संपर्क झालेला नाही.

बोगद्याच्या संरेखेची KML फाईल शेतकऱ्यांना देण्यात यावी.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की, बोगदा सरासरी ८० मिटर खाली असल्याने बांधकाम करण्यासाठी कोणतीही अडचण येणार नाही तसेच नगररचना विभाग व पुणे म.न.पा यांचे समन्वय साधून तसा पत्रव्यवहार व संपर्क करु.

धायरी गावात शाफ्ट साठी आवश्यक भूसंपादन करणाऱ्याा क्षेत्रावर प्रकल्प अधिकारी यांनी क्षेत्रिय पाहणी केलेली आहे.भूसंपादनाची कार्यवाही करताना याची फेरतपासणी करुन संबंधित शेतकऱ्यांना सर्व गोष्टींची कल्पना देऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

संरेखेची KML फाईल तयार असून ती उपलब्ध करुन देण्यात येईल.

**श्रीमती ज्योती कदम, मा. निवासी उपजिल्हाधिकारी- पुणे तथा (अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे) यांनी** विचारले की, बोगदा प्रकल्पात १ ते ३४ किलोमिटरच्या पुढे काय आहे तसेच सदर प्रकल्प पुर्ण होण्यासाठी किती कालावधी लागेल?

यावर प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की, बोगदा हा खडकवासला धरणापासून चालू होतो व अस्तित्वातील नवी मूठा उजवा कालव्यास ३४ व्या किलोमिटरला जावून मिळतो व ३४ किलोमिटर नंतर मूळ खूला कालवा आहे तसा प्रवाहित राहणार आहे. सदर प्रकल्पासाठी ३ वर्षांचा कालावधी लागणार आहे.

**श्रीमती ज्योती कदम, मा. निवासी उपजिल्हाधिकारी- पुणे तथा (अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे)** यांनी सदर प्रकल्पाची संरेखा कोणत्या सर्व्हे क्र. मधून जाते याची यादी शेतकऱ्यांसाठी कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण विभाग, पुणे या कार्यालयात उपलब्ध करुन देण्यास सांगितले, तसेच या प्रकल्पाचा पर्यावरणावर काय विपरीत परिणाम होणार आहे व सामाजिक पर्यावरण जबाबदारी यावर सविस्तर माहीती देण्यास सांगितली.

श्री. श्रीकांत काकडे सल्लागार यांनी बोगद्याच्या खोदकामातुन १६,७०,००० घमी मुरुम,दगड निघणार असुन या दगडांची विल्हेवाट लावण्याची कार्यवाही करताना ३,७५,००० घमी दगड ओपन चॅनेल भागाच्या बॅकफिलिंग करिता वापरला जाईल. ६,००,००० घमी दगड बांधकामाकरिता वापरला जाईल

व उर्वरित शिल्लक ६,९५,००० घमी दगड सखल भाग व लगतच्या खदान भरण्यासाठी करण्यात येईल असे सांगितले.

सामाजिक पर्यावरण जबाबदारी अंतर्गत सामाजिक बाबींच्या अनुषंगाने पिण्याच्या पाण्याची सोय करणे, तरुणांसाठी व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देणे, घनकचरा व्यवस्थापनाकरिता कार्यशाळा आयोजित करणे, शालेय परिसरात तसेच मोकळ्या जागेत हरित पट्टा निर्मिती करणे ही कामे करण्यात येतील असे सांगितले. याव्यतिरिक्त सामाजिक, आर्थिक कल्याण उपक्रमांच्या अनुषंगाने गावातील रस्ते करणे, शेतक-यांसाठी पीक व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, कीड नियंत्रय इ. विषयांवर कार्यशाळा आयोजित कार्णे, सभोवतालच्या परिसरातील शाळांमध्ये पर्यावरण विषयक जनजागृती करणे, वृक्षारोपनासारखे कार्यक्रम राबवणे अशी कामे करण्यात येतील असे सांगितले. सदर कामे करण्याकरिता पर्यावरण जबाबदारी अंतर्गत रक्कम रु. १०.९५ कोटी ३ वर्षांच्या कालावाधीत खर्च करण्यात येईल.

**९) श्री. रोहीत मते, खडकवासला, पुणे**

नविन मुठा उजवा कालव्याच्या रिकाम्या होणाऱ्या जमिनिवर पुढे काय करणार आहे?

यावर प्रकल्प अधिकारी यांनी नविन मुठा उजवा कालव्याच्या रिकाम्या होणाऱ्या जमिनिवर पर्यावरणपूरक गोष्टी ज्याच्या लोकांना उपयोग होईल अशा गोष्टी करण्याचे नियोजन आहे. सदरचा अभ्यास पुणे म.न.पा मार्फत चालू आहे हा अभ्यास पूर्ण झाल्यानंतर प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल.

**१०) श्री. विजय महादेव कोल्हे , माजी सरपंच खडकवासला, पुणे**

खडकवासला बोगदा प्रकल्प अतिशय उपयुक्त असुन सदर प्रकल्पामुळे पाणी वाया जाणार नाही. नविन मुठा उजवा कालव्याच्या रिकाम्या होणाऱ्या जमिनिवर पुढे काय करणार आहे तसेच ही जागा व्यावसायिकांना विकू नये जर विकायची असेल तर ती जागा मूळ शेतकऱ्यांना विकण्यात यावी.

यावर प्रकल्प अधिकारी यांनी सदर बाब धोरणात्मक असून यांसंबंधी वरीष्ठ स्तरावर निर्णय देण्यात येईल असे सांगितले.

**११) ग्रामपंचायत लोणी काळभोर, पुणे**

फुरसुंगी शिवेपासून लोणी काळभोर हद्दीत नविन मुठा उजवा कालवा जसा चालू आहे तसा चालू ठेवण्यात यावर कसलाही बदल करू नये अशी स्थानिक शेतक-यांची व ग्रामस्थांची मागणी आहे असे लेखी निवेदन ग्रामपंचायत लोणी काळभोर यांचेकडून प्राप्त झाले.

**१२) एस. एस. आर. पॉवर एल. एल. पी, कोथरूड, पुणे**

एस. एस. आर. पॉवर एल. एल. पी, कोथरूड, पुणे यांच्या दि. २८/०२/२०२५ रोजीच्या प्राप्त पत्रान्वये अभिकरणाने त्यांच्या पत्र क्रं . SSR/Khadakwasala/SHP/07/2022-23, दि. २७/०६/२०२२ अन्वये सादर केलेल्या संरेखा क. १अ प्रमाणे बोगद्याचे काम करणेबाबत सांगितले आहे. त्या संरेखेप्रमाणे

बोगद्याची सुरूवात पॉवर हाऊसच्या खालीलबाजूपासून व विभाग आणि त्यांनी बांधलेल्या कालवा विमोचकापासून होते.

प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांनी सदर प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक सविस्तर चर्चा झाली असून अजून काही प्रश्न असल्यास लेखी स्वरुपात देण्यात यावे व सभा संपवण्याची विनंती अध्यक्षांना केली व त्यांचे आदेश घेऊन अध्यक्षांचे व उपस्थितांचे आभार मानून जाहीर लोकसूनावणी संपली असे जाहीर केले.

6/3/25

**(श्री.कार्तिकेय लंगोटे)**
समन्वयक
उपप्रादेशिक अधिकारी, पुणे- १,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे

**(श्री. जगन्नाथ साळुंखे)**
सदस्य
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे

**(मा.ज्योती कदम)**
अध्यक्ष
मा. निवासी उपजिल्हाधिकारी-पुणे तथा
अपर जिल्हादंडाधिकारी,पुणे